**मे. सात्रळ केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड, गट क्रमांक नं. १३१/४, १३१/५ व १३१/६ मुक्काम पोस्ट - गडधे आखाडा (चिंचाळे), तालुका - राहुरी, जिल्हा - अहमदनगर (४१३ ७०५), महाराष्ट्र यांच्या धान्यावर आधारित २००.० किलो लिटर प्रतिदिन क्षमतेच्या रेक्टिफाईड स्पिरिट/इ.एन.ए./इथेनॉल उत्पादनासाठी नवीन आसवणी प्रकल्प उभारणेकरिता पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत-**

---

मे, सात्रळ केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड, गट क्रमांक नं. १३१/४, १३१/५ व १३१/६ मुक्काम पोस्ट - गडधे आखाडा (चिंचाळे), तालुका - राहुरी, जिल्हा - अहमदनगर (४१३ ७०५), महाराष्ट्र यांच्या धान्यावर आधारित २००.० किलो लिटर प्रतिदिन क्षमतेच्या रेक्टिफाईड स्पिरिट/इ.एन.ए./इथेनॉल उत्पादनासाठी नवीन आसवणी प्रकल्प उभारणेकरिता पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बुधवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार कार्यालयीन आदेशान्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी,अहमदनगर किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - **अध्यक्ष**

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, - **सदस्य**
मुंबई यांचे प्रतिनिधी
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक

३) उप प्रादेशिक अधिकारी, - **आयोजक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
अहमदनगर

श्री संजीव अ. रेदासनी, प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री संदीप निचित, अपर जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, डॉ. प्रवीण जोशी, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नाशिक तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

**आयोजक** यांनी सांगितले कोविड-१९ आणि ओमिक्रॉन संसर्गजन्य साथीच्या पार्श्वभूमीवर सदरहू जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी पारित केलेल्या निर्देशांनुसार बैठकीच्या स्थानी एकावेळी फक्त ४० व्यक्तींनाच एका सत्रात परवानगी देण्यात आलेली असून जर उपस्थितांची संख्या जास्त असल्यास त्यांना पुढील सत्रात संधि देण्यात येईल व सर्व उपस्थितांना जनसुनावणी बैठकीत संधि मिळेपर्यंत बैठक चालू ठेवण्यात येईल. आयोजक यांनी पुढे सांगितले

की कोविडच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले. त्यानुसार प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे व सॅनिटायझरचा वापर बैठकीच्या प्रवेशव्दारावर करण्यात आलेला असून बैठकीच्या स्थानावर प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवणे बंधनकारक असल्याने ते निर्देश पाळण्याची सूचना केली. आयोजक यांनी पर्यावरणविषयक सुनावणीबाबतचे महत्त्व व प्रक्रिया याबाबतची माहिती दिली व सदरहू प्रकल्पाबाबत उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ अहमदनगरकडे पाठिंबा दर्शविणारी एकूण ०७ निवेदने प्राप्त झालेली आहेत असे सांगितले.

**प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार** यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पात पर्यावरण व्यवस्थापनासाठी एकूण भांडवली गुंतवणूक रुपये २२.० कोटी आहे. सदरहू प्रकल्पात निर्माण होणा-या सांडपाण्यावर सी.पी.यु. मध्ये प्रक्रिया केली जाईल आणि त्याचा पुनर्वापर केला जाईल. सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज/ शून्य द्रव निःस्सारण तंत्रज्ञानावर असेल. सदरहू प्रकल्पामुळे १३० व्यक्तींना प्रत्यक्ष व अंदाजे १०० व्यक्तींना अप्रत्यक्ष रोजगाराची संधि उपलब्ध होईल. **पर्यावरण सल्लागार** यांनी सांगितले की कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदार निधी/Corporate Environment Responsibility Fund (CER) Fund दरवर्षी राखून ठेवण्यात येईल आणि नियमांनुसार खर्च करण्यात येईल.

**आयोजक** यांनी उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन केले.

सदर सुनावणीमध्ये खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झालेले आहेतः-

१) <u>श्री बापूसाहेब राणुजी गडधे, राहणार-गडधे आखाडा (चिंचाळे), तालुका-राहुरी, जिल्हा-अहमदनगरः-</u>

**श्री बापूसाहेब रामाजी गडधे** यांनी असे सांगितले की हा प्रकल्प या परिसरात कार्यान्वित होणार आहे, या परिसरात शेतजमीन आहे, आणि माझे शेत हे प्रकल्पाला लागूनच आहे. या प्रकल्पातून बाहेर पडणा-या घातक पदार्थांमुळे या परिसरातील शेतजमिनीवर, पीकांवर आणि शेतक-यांच्या जीवनावर काही दुष्परिणाम होतील का? सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे या प्रकल्पात उत्पादनासाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची गरज लागणार आहे, प्रकल्पात मोठ्या प्रमाणात सांडपाणी उत्पन्न होणार आहे, हे सांडपाणी आमच्या आजूबाजूच्या शेतजमिनीत जर मुरले तर आमच्या परिसरातील पिण्याच्या पाण्याचे व सिंचनाचे स्त्रोतांवर तसेच आरोग्यावर काही दुष्परिणाम होईल का? याबाबत प्रकल्प व्यवस्थापनाने काही उपाययोजना केलेल्या आहेत का? त्यांनी सूचना केली हा प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर आमच्या गावातील होतकरु तरुण, तरुणींना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे प्रकल्पात रोजगाराची संधि देण्यात यावी.

**पर्यावरण सल्लागार** यांनी सांगितले की गडधे आखाडा हे गाव प्रकल्पाच्या दक्षिण-पुर्वेकडे आहे. वा-याची दिशा ही मार्च, एप्रिल, मे या कालावधीत पश्चिम-उत्तर अशी असते. म्हणजे गडधे आखाडा गावाकडे आहे त्यानंतर वा-याची दिशा बदलते. प्रकल्पात ६५ मीटर्स उंचीची चिमणी बसविणार असून त्यास इलेक्ट्रो-स्टॅटिक-प्रेसिपरेटर कार्यान्वित करण्यात येणार आहे त्यामुळे धुलीकण बाहेर जाणार नाहीत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संमतीपत्रामधील अटी

व शर्तींच तंतोतन पालन करण्यात येईल. सदरहू प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण या तंत्रज्ञानावर असून प्रकल्पात उत्पन्न होणा-या सांडपाण्याचा पुनर्वापर करण्यात येणार आहे.

**आयोजक** यांनी पर्यावरण सल्लागार यांना विचारले की वा-याची दिशा ही गडधे आखाडा गावाकडे असल्यामुळे हवा प्रदूषणाचा या गावावर परिणाम होईल का?

**पर्यावरण सल्लागार** यांनी उत्तर दिले की सदर गावास हवा प्रदूषणाचा परिणाम होणार नाही कारण ६५ मीटर उंचीच्या चिमणीतून निघणारे धुलीकण हे ३.९ कि.मी. अंतरावर स्थिरावतील व गडधे आखाडा गावाचे अंतर प्रकल्पापासून १,६४ कि.मी. एवढे आहे.

**अध्यक्ष** यांनी सांगितले की श्री बापूसाहेब गडधे यांनी विविध प्रश्न विचारलेली असल्यामुळे उत्तर सर्व मुद्द्यांवर द्यावे.

**पर्यावरण सल्लागार** यांनी उत्तर दिले की प्रकल्पापासून ताहराबाद २.९२ कि.मी., गडधे आखाडा १.६४ कि.मी., वडनेर ६.३९ कि.मी., घोरपड वाडी ४.२३ कि.मी., पाटीलवाडी ३.० कि.मी., कनगर ४.५ कि.मी. व राहुरी ५.५९ कि.मी. हवाई अंतरावर आहे. या सात गावांतून पाण्याचे नमुने घेतलेले आहेत. यापैकी पाटीलवाडी, गडधे आखाडा व ताहराबाद ही गावे प्रकल्पाजवळ आहेत. या तीनही गावात पाण्यातील ४० घटक तपासलेले असून बहुतांश घटक हे विहित मानकांच्या मर्यादेत आहेत. हा प्रकल्प शून्य द्रव निःस्सारण तंत्रज्ञानावर असणार आहे त्यामुळे प्रक्रिया केलेले सांडपाणी बाहेर जाणार नाही. प्रकल्पात इलेक्ट्रो-स्टॅटिक-प्रेसिपरेटर व ६५ मीटर उंचीची चिमणी उभारणार असल्यामुळे हवेच्या प्रदूषण पातळीत वाढ होणार नाही प्रकल्पात १५० कुशल व १०० अकुशल कामगार लागणार

आहेत. परिसरातील उपलब्ध कुशल कामगारांना रोजगाराची संधि देण्यात येईल.

**व्यवस्थापकीय संचालक** यांनी सांगितले की प्रकल्पात लागणारे अकुशल कामगार सभोवतालच्या परिसरातूनच घेण्यात येतील. याकरिता स्थानिक ग्रामपंचायत कार्यालयाने गरजू व्यक्तींची याची दिली तर प्राधान्य देण्यात येईल. कुशल कामगार स्थानिकांतून त्यांच्या कौशल्य व अनुभवाप्रमाणे घेण्यात येईल. अतिकुशल कामगारच बाहेरुन बोलविण्यात येतील. शैक्षणिक अर्हता असलेल्या स्थानिकांना प्रकल्पातच प्रशिक्षण भत्यावर प्रशिक्षण देण्यात येईल.

**सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सांगितले की सादरीकरणात परिसरातील पाण्यामध्ये सर्व घटकांची मात्रा विहित मर्यादेत आहे परंतु काही ठिकाणी भूजलामध्ये फ्लोराईड्चे प्रमाण जास्त असल्याचे दिसते. भूजलातील फ्लोराईड्चे प्रमाण जास्त असल्याबाबत राष्ट्रीय हरित लवादामध्ये अर्ज दाखल केलेला आहे. विहिरीच्या पाण्यात फ्लोराईड्चे प्रमाण जास्त असण्याचे कारण व त्यावर उपाययोजना याबाबतची माहिती द्यावी.

२) **श्री सतिश भाऊसाहेब बाचकर, राहणार- राहणार-गडदे आखाडा (चिंचाळे), तालुका-राहुरी, जिल्हा-अहमदनगरः-**

**श्री बाचकर** यांनी विचारले की सदरहू प्रकल्पामुळे आमच्या गावाला काय सुविधा व फायदा मिळेल?

३) **श्री मोतीराम कोंडाजी वडीतके, राहणार-चिंचाळे, तालुका-राहुरी, जिल्हा-अहमदनगरः-**

**श्री वडीतके** यांनी सांगितले की प्रकल्पाजवळ ओढा असून तो चिंचाळे गावात जातो जर या ओढ्यातून सांडपाणी गेले तर

परिसरातील लोकांना प्रदूषणाचा त्रास होईल त्यामुळे प्रदूषण नियंत्रणाचे काम योग्य प्रकारे करण्यात यावे. तसेच कुशल कामगार हे गडधे आखाडा, चिंचाळे इत्यादी गावातीलच घ्यावेत.

**व्यवस्थापकीय संचालक** यांनी उत्तर दिले की श्री मोतीराम वडीतके यांनी परिसरातीलच कामगार घेण्याची सूचना केली त्याबद्दल त्यांचे आभार. प्रकल्प सुरु झाल्यानंतर नियमाप्रमाणे सीएसआर निधी खर्च करणे बंधनकारक असल्यामुळे हा निधी वेगवेगळ्या उपक्रमामध्ये परिसरातील गावात सामाजिक कार्यकर्ते व लोकप्रतिनिधी यांच्याशी चर्चा करुन खर्च करण्यात येईल. हा भाग दुष्काळी असून या परिसरात मोजक्याच लोकांनी ५-६ कि.मी. अंतरावरुन तिप्पट खर्च् करुन सायफन आणलेले आहे हे आम्हाला ज्ञात आहे. फ्लोराईड हे मनुष्याच्या शरीराला घातक आहे व याचे येथे प्रमाण २.१ मिलीग्रॅम/लिटर एवढे आहे त्यामुळे याचा विचार करावाच लागणार आहे. हा प्रकल्प शून्य द्रव निःस्सारण तंत्रज्ञानावर असल्यामुळे या प्रकल्पातून पाण्याचा एकही थेंब बाहेर जाणार नाही. या प्रकल्पात औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणारच आहे. औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करुन निघणा-या घन पदार्थाचा खत म्हणून वापर करण्यात येईल. प्रकल्पातून निघणारी राख ही वीट उत्पादकांना देण्यात येईल. या प्रकल्पात प्रदूषण नियंत्रण संयंत्रणेवर एकूण रुपये २२ कोटी खर्च करण्यात येणार आहे त्यामुळे परिसरात प्रकल्पाच्या प्रदूषणाचा त्रास होणार नाही.

**प्रकल्प संचालक** यांनी सांगितले की या प्रकल्पामध्ये धान्यापासून इथेनॉल निर्माण होणार आहे. त्यामध्ये डीडीजीएस

किंवा डीड्ब्लुजीएस हे उप-पदार्थ तयार होणार असून त्याचा वापर पशूखाद्य म्हणून करण्यात येतो. या प्रकल्पात रोजगार हा परिसरातील नागरीकांना प्रत्यक्ष फायदा असून प्रकल्पास लागणारे धान्य स्थानिक शेतक-यांकडून विकत घेण्यात येईल व याचा अप्रत्यक्ष फायदा शेतक-यांना शेतमालाला चांगला भाव मिळण्यात होईल. प्रकल्पातील राख स्थानिक वीट उत्पादकांना देण्यात येईल.

**व्यवस्थापकीय संचालक** यांनी सांगितले की प्रकल्प स्थानावर कमीतकमी पाच फूट उंचीची ४,२०० झाडे लावणार असून त्याची देखभाल सुध्दा करण्यात येईल. याठिकाणी मळीचा कच्चा माल म्हणून वापर करण्यात येणार नाही. त्यामुळे परिसरात प्रदूषण होण्याची शक्यता नाही. स्थानिक लोकांना त्यांच्या मागणीनुसार पाणी उपलब्ध करुन देण्यात येईल.

**४) श्री बाबासाहेब जानकु वडितके, ग्रामपंचायत सदस्य, चिंचाळे ग्रामपंचायत, तालुका-राहुरी, जिल्हा-अहमदनगरः-**

**श्री वडितके** यांनी सांगितले की प्रकल्पाच्या जमिनीतील सांडपाण्याच्या टाकीमुळे सांडपाणी झिरपून परिसरातील विहिरी व बोअरचे पाणी खराब होईल का? या प्रकल्पामुळे धुराचा व वासाचा त्रास होईल का?

**व्यवस्थापकीय संचालक** यांनी उत्तर दिले की जमिनीतील सांडपाणी टाकी ही विशिष्ट प्रकारची मजबूत नियमानुसार बांधण्यात येईल त्यामुळे या टाकीतून सांडपाणी झिरपणार नाही. कारखान्याचे उत्पादन सुरु करण्यापूर्वी प्रदूषण नियंत्रण संयंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल व त्यासाठी रुपये २२ कोटी खर्च करण्यात येईल. प्रकल्प सुरु झाल्यावर गावक-यांच्या सूचना अंमलात आणल्या

जातील. या प्रकल्पात ईएसपी व सायलोज मुळे चिमणीतून धुर येणार नाही. या प्रकल्पात मळीचा वापर होणार नसल्यामुळे परिसरात वासाचा त्रास होण्याची शक्यता नाही.

५) **श्री बापूसाहेब राणुजी गडधे, राहणार-गडदेआखाडा (चिंचाळे), तालुका-राहुरी, जिल्हा-अहमदनगरः-**

**श्री गडधे** यांनी सांगितले की या प्रकल्पात मका व तांदुळापासून इथेनॉल तयार करण्यात येणार आहे. या परिसरात तांदळाचे उत्पन्न होत नाही व परिसरामध्ये मक्याचे उत्पन्न होते. या प्रकल्पाकडुन शेतक-यांना मक्याचे बियाणे देणार का व त्याबाबत काय नियोजन आहे? शेतक-यांना हमीभावाचे वचन प्रकल्पाकडून देणार का?

**व्यवस्थापकीय संचालक** यांनी उत्तर दिले की परिसरा बाहेरुन धान्य खरेदी केल्यास वाहतुकीचा खर्च जास्त होईल व वेळ जास्त लागेल त्यामुळे कारखान्याचे नुकसान होईल. प्रकल्पाचे क्षेत्र अधिकारी १०.० कि.मी. परिसरातील शेतक-यांना भेटतील. जास्त उत्पादन देणा-या मक्याच्या बियाण्याबाबत राहुरी विद्यापीठाशी चर्चा सुरु आहे. प्रकल्पाकडून शेतक-यांना मका उत्पादनासाठी निधी पुरविला जाईल व जास्त उत्पादन देणारे मक्याचे बियाणे शेतक-यांना उपलब्ध करुन देण्यात येतील.

६) **श्री योगेश रामदास गडधे, राहणार-गडधे आखाडा (चिंचाळे), तालुका-राहुरी, जिल्हा-अहमदनगरः-**

**श्री गडधे** यांनी सांगितले की या परिसरात एक खडी केंद्र असून तेथील धुळीमुळे परिसरातील पीकांची खूप हानी होते.

**सदस्य** यांनी सूचना केली की आपण या प्रस्तावित प्रकल्पाबाबत मत नोंदवावे.

**श्री गडधे** यांनी सांगितले की माझे शेत प्रकल्पाला लागूनच आहे त्यामुळे या प्रस्तावित प्रकल्पाच्या प्रदूषणाचा त्रास होऊ नये याची नोंद घ्यावी.

**सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी विचारले की आपण १९८ व्या बैठकीत सांगितलेल्या विशिष्ट अटी व शर्ती यांची नोंद घेतली आहे काय? या प्रकल्पात या विशिष्ठ अटी व शर्तीनुसार आगमन व प्रस्थानकरिता वेगळी सोय असावी. प्रकल्प प्रवर्तकांनी पाटबंधारे विभाग व सीजीडब्लुएसची परवानगी घेऊन ती सादर करणे आवश्यक आहे. वाहतुक व्यवस्था योजना (Traffic Management Plan) तयार करणे, स्थानिक ग्रामपंचायतीकडून रस्त्याची रुंदी ९.० मीटर मंजूर करुन घेणे या मुद्द्यांचा उल्लेख सादरीकरणात आणि पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात नाही. व पर्यावरण सल्लागार व प्रकल्प प्रवर्तक यांनी याबाबत जनसुनावणीत भाष्य केलेले नाही. स्थानिक जनतेला विश्वासात घेऊनच वाहतुक व्यवस्था योजना (Traffic Management Plan) तयार करणे आवश्यक आहे. या मुद्द्यांबाबत पुढील कार्यवाही करण्यात येऊन त्याचा अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समावेश करावा. ऑनलाईन मॉनिटरिंग सिस्टिमबाबत काहीही उल्लेख नाही. सादरीकरणात पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत योग्य प्रकारे स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. गावातील विहिरींमध्ये फ्लोराईड आहे. गावक-यांना विश्वासात घेऊनच प्रकल्प कार्यान्वित करण्यात यावा.

**व्यवस्थापकीय संचालक** यांनी सांगितले की. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाबाबत ज्या सूचना करण्यात आल्या, त्यांचा अंतर्भाव अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात करण्यात येईल.

**अध्यक्ष** यांनी खालील सूचना दिल्या:-

१) प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतरही कुठलीही पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप यांची नोंद प्रकल्प प्रवर्तकांनी घ्यावी व उपाय योजनांची अंमलबजावणी करावी.

२) प्रकल्प प्रवर्तकांनी चांगले बियाणे शेतक-यांना उपलब्ध करुन द्यावे व त्यांच्या शेतमालाला योग्य भाव द्यावा.

३) प्रकल्पामुळे हवा, पाणी व इतर पर्यावरणीय घटकांवर परिणाम होणार नाही याची काळजी घ्यावी.

४) सीएसआर निधीचा काही भाग/हिस्सा सामाजीक योजनांसाठी खर्च करणे बंधनकारक असल्यामुळे ग्रामपंचायतीने आवश्यक गोष्टींसाठी ठराव करावा.

५) प्रकल्प प्रवर्तकांनी स्थानिकांना रोजगारात प्राधान्य द्यावे.

६) प्रकल्प प्रवर्तकांनी नियमितपणे येथील माती, पाणी, परिसरातील विहिरी व बोअरवेलचे नमुने दर सहा महिन्यांनी तपासावे व येणारे निष्कर्ष कारखान्याच्या दर्शनीभागावर लावण्यात यावेत,

७) या प्रकल्पामुळे या परिसरात जी वर्दळ वाढणार आहे त्यामुळे एक वार्डन नियुक्त करावा,

८) येथील दैनंदिन जीवनावर कुठलाही दुष्परिणाम या प्रकल्पामुळे होणार नाही याची कारखाना व्यवस्थापनाने काळजी घ्यावी.

**आयोजक,** पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे, पत्रकार, शासकीय अधिकारी, स्थानिक जनतेचे आभार मानले व मा. अध्यक्षांच्या अनुमतीने जनसुनावणी ही संपन्न् झाल्याचे घोषित केले.

**(संजीव अ. रैदासनी)**
आयोजक ,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
प्रभारी उप प्रादेशिक
अधिकारी,
मप्रनि मंडळ
अहमदनगर,

**(डॉ. प्रवीण एम. जोशी)**,
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर
लोकसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ ,
नाशिक

**(संदीप निचित),**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर,
जिल्हा- अहमदनगर